# कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २१७ /२०२५ दि. १८/०९/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कल्याण** शहरात दि. २२/०९/२०२५ ते दि. ०२/१०/२०२५ या कालावधीत **नवरात्रौत्सव व दसरा** हे सण **दुर्गामाता मंदिर, दुर्गाडी किल्ला, कल्याण पश्चिम** येथे साजरे होणार आहेत. सदर कालावधीत जनसमुदाय रस्त्यावर येवून सण साजरा करीत असतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) नवी मुंबई, पनवेल, महापे पाईपलाईन, मुंब्रा मार्गे कल्याण नाका येथून कल्याण दिशेने पत्रीपूल मार्गे कल्याण शहरात प्रवेश करून नाशिक – मुंबई हायवे, भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **मुंब्रा वाहतूक उप विभाग हद्दीतील कल्याण** नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने मुंब्रा बायपास मार्गे खारेगाव टोलनाका, नाशिक – मुंबई महामार्गाने इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) तळोजा बायपास मार्गे खोणी निसर्ग ढाबा कडून कल्याण शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **कोळसेवाडी वाहतूक उप विभाग हद्दीतील खोणी निसर्ग ढाबा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने बदलापूर अंबरनाथ व काटई बदलापूर चौक – लोढा पलावा – कल्याण फाटा मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) नेवाळी नाका (विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग) कडून मलंग रोडने चक्कीनाका – पत्रीपूल मार्गे कल्याण शहरात प्रवेश करणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **नेवाळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने बदलापूर अंबरनाथ हायवे मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) श्रीराम चौक (विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग) कडून कोळसेवाडी वाहतूक उप विभाग हद्दीत जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **श्रीराम चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने श्रीराम चौक कडून उल्हासनगर, शहाड, अंबरनाथ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) शहाड – प्रेम ऑटो – दुर्गामाता चौक – कोनगाव, भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, खाजगी बसेस, जड–अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **आधारवाडी चौक (कल्याण वाहतूक उप विभाग)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने आधारवाडी चौक येथून उजवीकडे वळून गंधारी ब्रिज – बापगाव – सोनाळे मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ६) रांजनोली नाका (कोनगाव वाहतूक उप विभाग) कडून कोनगाव मार्गे कल्याण दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, खाजगी बसेस, जड–अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने रांजनोली नाका येथून मुंबई – नाशिक महामार्ग – खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ७) ठाणे ग्रामीण हद्दीतून बापगाव मार्गे गंधारी ब्रिजकडून कल्याण दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **गांधारी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने सावदनाका येथून सोनाळे मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना नवरात्रौत्सव व दसरा सणाचे कालावधीत दि. २२/०९/२०२५ रोजी ते दि. ०२/१०/२०२५ रोजीचे दरम्यान सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका.
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

**प्रत** :— सर्व संबंधीत वाहतूकदार संघटना.